सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन - वन विभाग

# कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - 416309 महाराष्ट्र

दूरध्वनी क्रमांक - 02346 - 271212 ई-मेल - princpalkundal@gmail.com

## सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षक यांची सेवा करार पध्दतीने पद भरती करणेबाबतची जाहिरात

कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे विभागीय वन अधिकारी व सहा. वनसंरक्षक या दर्जाच्या पदावर सेवानिवृत्त झालेले विभागीय वन अधिकारी मधून दोन अधिका-यांची व सहा. वनसंरक्षक मधून एका अधिका-याची सेवा करार पध्दतीने कुंडल वन अकादमी येथील विवक्षित कामाकरीता नेमणूक करणेची आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणारे सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी व सहा. वनसंरक्षक यांचे अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | भरावयाचे पद | भरावयाची पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे विविध दर्जाचे अधिकारी /कर्मचारी यांचे अल्प व दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण सत्र आयोजित करणे, त्यांचे संचालन करणे व त्यामध्ये व्याख्यान देणे, प्रशिक्षण देणे, वनक्षेत्रपाल व अन्य दर्जाचे अधिकारी यांचे भारताचे विविध भागातील अभ्यास दौ-याचे नियोजन व त्यानूसार अभ्यास दौ-यामध्ये सहभागी होऊन अभ्यासदौ-याचे अनुषंगाने कार्यवाही करणे | विभागीय वन अधिकारी (सेवानिवृत्त) | 02 |
| 2 | कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे विविध दर्जाचे अधिकारी /कर्मचारी यांचे अल्प मुदतीचे प्रशिक्षण सत्र आयोजित करणे, सदर प्रशिक्षण कार्यक्रमाशी निगडीत सर्व संबंधित कामांची अंमलबजावणी करुन प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडणे, व त्यामध्ये व्याख्यान देणे, प्रशिक्षण देणे, वनक्षेत्रपाल व अन्य दर्जाचे अधिकारी यांचे भारताचे विविध भागातील अभ्यास दौ-याचे नियोजन व त्यानूसार अभ्यास दौ-यामध्ये सहभागी होऊन अभ्यासदौ-याचे अनुषंगाने कार्यवाही करणे | सहा.वनसंरक्षक (सेवानिवृत्त) | 01 |
| | एकूण | | 03 |

**अर्ज सादर करणेचा कालावधी** :- दिनांक 09/11/2022 ते अंतिम दिनांक 24/11/2022अखेर (सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत) पर्यंतचा आहे. सदरचा अर्ज हा खालील पत्यावर लिखित स्वरुपात समक्ष, पोस्टाद्वारे अथवा ईमेलद्वारे सादर करावा. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. अर्जासोबत सेवानिवृत्ती वेळी मिळत असलेल्या वेतनाचा तपशिल जोडावा.

**अर्ज सादर करणेचा पत्ता** :- महासंचालक, कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल, क्रांती सहकारी साखर कारखानाशेजारी, कुंडल विटा रस्ता, ता.पलूस, जि. सांगली 416309

**अटी व शर्ती** :-

1. वनविभागातून विभागीय वन अधिकारी आणि सहा. वनसंरक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.
2. कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे निवासी प्रशिक्षण आयोजित केले जात असून कुंडल अकादमी मध्ये निवासस्थानी राहणे अनिवार्य राहील.
3. कुंडल वन अकादमीमध्ये विविध अल्प व दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण सत्र आयोजित करणे, त्यांचे संचालन करणे , प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आणि त्या अनुषंगाने प्रशिक्षण सत्रामध्ये व्याख्याने देणे.
4. वनक्षेत्रपाल, वनपाल तसेच इतर संवर्गाच्या अभ्यास दौ-याचे नियोजन व त्यानूसार अभ्यास दौ-यामध्ये सहभागी होऊन अभ्यासदौ-याचे अनुषंगाने कार्यवाही करणे.
5. सदरची सेवा ही सेवा करार पध्दतीने असल्याने नियुक्तीची सेवा समाप्त करण्याचा अधिकार कुंडल वन अकादमीस राहील.
6. इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द वनविभागात कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.
7. नियुक्तीचे कालावधीत करारपध्दतीने विवक्षित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहिल.
8. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. संकिर्ण -2715/प्र.क्र.100/13 दि. 17 डिसेंबर 2016 अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
9. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. संकिर्ण -2715/प्र.क्र.100/13 दि. 17 डिसेंबर 2016 मधील तरतूदीनूसार मासिक व पारिश्रमिक भत्ते देण्यात येतील.
10. सदरची नियुक्ती ही करार पध्दतीने असल्यामुळे नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा कोणत्याही हक्कांची मागणी करता येणार नाही.
11. करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्ती वन अधिकारी हा शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच, प्रस्तावित सेवांसाठी त्यांच्याकडे क्षमता असावी

सविस्तर जाहिरात कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडलचे www.kundalforestacademy.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. अर्ज करण्यासाठी अर्ज नमूना सोबत उपलब्ध असेल तसेच यासाठी दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आले नंतरच नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जे.पी. त्रिपाठी, भा.व.से)

**महासंचालक**

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन - वन विभाग
कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल
मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - 416309 महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक - 02346 - 271212 ई-मेल - princpalkundal@gmail.com

## सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षक यांची सेवा करार पध्दतीने पद भरती करणेकरीता

## अर्जाचा नमुना

रंगित फोटो

प्रति,

महासंचालक,
कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल

विषय :- विभागीय वन अधिकारी/ सहाय्यक वनसंरक्षक या पदासाठी अर्ज.
संदर्भ :- दैनिक..............................दिनांक........................मधील जाहिरात.

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असून माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. संपूर्ण नाव :-
2. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-
3. संपूर्ण पत्ता :-
4. मोबाईल क्रमांक :-
5. ईमेल आयडी :-
6. शैक्षणिक पात्रता :-
7. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पदनाम :-
8. शासकीय सेवेत रुजू दिनांक :-
9. शासकीय सेवेत सेवानिवृत्तीचा दिनांक
10. सेवानिवृत्ती च्या वेळेचे वेतन अथवा
    सेवानिवृत्ती वेळचे निवृत्ती वेतन :-
11. अनुभव :-

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

(टिप :- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती आणि सेवानिवृत्ती वेळी घेत असलेले वेतन अथवा सेवानिवृत्ती वेतन मिळत असलेला तपशिल जोडावा.)